भारतीय रिज़र्व बैंक

RESERVE BANK OF INDIA

www.rbi.org.in

आरबीआय/२०१२-१३/२४४

डीपीएसएस(सीओ)इपीपीडी क्र. ६२२/०४.०३.०१/२०१२-१३ १२ ऑक्टोबर, २०१२

**एनईएफटीमध्ये भाग घेणा-या सभासद बँकांचे**

**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी.**

महोदय/महोदया

**नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड्स ट्रान्स्फर (एनईएफटी) - व्यवहारांमध्ये इंडियन फायनान्शियल सिस्टिम कोड (आयएफएससी) ची आवश्यकता**

जवळजवळ रियल टाईममध्येच, निधी हस्तांतरण करण्यासाठी एक सक्षम परवडणारी व सुरक्षित अशी रीत एनईएफटी उपलब्ध करुन देते.अलिकडील काळात, एनईएफटीखाली प्रक्रिया झालेल्या व्यवहारांचे आकारमान व मूल्य ह्यात झालेली वाढ ही, लोकसंख्येच्या नव-नवीन घटकांनीही त्यांच्या प्रेषणाच्या आवश्यकता पूर्ण करण्यास केलेल्या ह्या पध्दतीच्या उपयोगामुळे, ह्या पध्दतीची लोकप्रियता दिसून येते.

(२) एनईएफटी व्यवहारांमधील एक घटक हा लाभार्थी बँकेच्या आयएफएस कोड नंबरशी संबंधित आहे आणि संबंधित व्यवहार योग्य त्याच बँकेकडे जाण्यासाठी ते अनिवार्य करण्यात आले आहे. एनईएफटीचा आदर्श अर्जाचा फॉर्म, (म्हणजे, एनईएफटी प्रोसिजर गाईडलाईन्स दि. एप्रिल २०११ च्या जोडपत्र ३ मधील फॉर्म एनईएफटी -२अ) वरुन लाभार्थी बँक, तिची शाखा व तिचा आयएफएससी क्रमांक कळून येतो.

(३) एनईएफटी व्यवहार होत असलेल्या शाखांमधील ग्राहक सेवेत वाढ करण्यासाठी व प्रेषणाच्या इलेक्ट्रॉनिक पध्दतींना अधिकतर प्रोत्साहन देण्यासाठी, सहभागी बँकांना पुढीलप्रमाणे सल्ला देण्यात येत आहे :

(१)एनईएफटीच्या फॉर्ममध्ये आवश्यक असलेली माहिती (लाभार्थी खात्याच्या बँक शाखेच्या माहितीसह) भरण्यासाठी बँकेच्या कर्मचा-यांनी योग्य ती मदत करावी.

(२) जेथे ग्राहकांनी आयएफएस कोड व लाभार्थी बँकेच्या शाखेची माहिती दिली आहे तेथे ती योग्यप्रकारे जुळत असल्याची खात्री बँकांनी करुन घ्यावी. ती जुळत नसल्यास तो व्यवहार सुरु करण्यापूर्वी, दुरुस्त करण्यासाठी ते ग्राहकाच्या नजरेस आणावे.

भुगतान आणि प्रदान प्रणाली विभाग, केंद्रीय कार्यालय, १४ वा मजला, केंद्रीय कार्यालय ईमारत, शहिद भगत सिंग मार्ग, मुंबई - ४००००१ दुरध्वनी :(९१-२२) २२६४ ४९९५; फॅक्सः (९१-२२) २२६९१५५७ ईमेल : cgmdpssco@rbi.org.in

(३) जेथे लाभार्थी बँक संबंधाने ग्राहक एकच इनपुट देऊ शकत असेल (आयएफएस कोड किंवा शाखेचे नाव) तेथे, तो व्यवहार सुरु करण्यापूर्वी, बँकेच्या कर्मचा-यांनी, अन्य माहिती मिळविण्यासाठी व ती एनईएफटी अर्जाच्या फॉर्मवर ग्राहकाकडून भरुन घेण्यास मदत करावी.

(४) बँकांद्वारे अनुसरल्या जाणा-या मेकर-चेकर/दोनदा पडताळणी कार्यरीतीमध्ये, ग्राहकाने एनईएफटी फॉर्मवर दिलेली माहिती, वरीलप्रमाणे आयएफएससी क्रमांकाची पडताळणी ह्यांचाही समावेश असावा.

(५) बँकांनी  खात्री करुन घ्यावी की विनात्रास/बिनचुक एनईएफटी व्यवहारांसाठी असलेल्या ह्या सूचना त्यांच्या सर्व शाखांना अनुपालनासाठी कळविण्यात आल्या आहेत.

कृपया पोच द्यावी व पालन करावे.

आपला विश्वासु

(विजय चुग)

मुख्य महा व्यवस्थापक